क्रमांक : १२९९४ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २१ जून, २०२२

**संदर्भ :-** या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१०६५०/क-१, दिनांक २४ मे, २०२२

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील अधिकारी / कर्मचारी यांना विधिमंडळ कामकाजाच्या आवश्यकतेनुसार संबंधित विषयांची सखोल माहिती प्राप्त होण्याकरीता तसेच त्यांच्या कामात गतीमानता आणण्याकरीता वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रशिक्षण वर्गाचे (In House Training) आयोजन मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई येथे करण्यात आले आहे. वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रामार्फत या प्रशिक्षण वर्गासाठी विषय व वक्ते यांची निवड करण्यात आली आहे.

सदर प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ शुक्रवार, दिनांक २४ जून, २०२२ रोजी दुपारी १२.०० ते १.०० या वेळेत मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्या व्याख्यानाने करण्यात येत आहे. या सचिवालयामार्फत वेळोवेळी आयोजित प्रशिक्षणावेळी सर्व अधिकारी/ कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य असल्याबाबत संदर्भाधिन परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले आहे.

यास्तव, वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रामार्फत शुक्रवार, दिनांक २४ जून, २०२२ रोजी आयोजित प्रशिक्षणाकरीता या सचिवालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित राहणे क्रमप्राप्त आहे.

**( सुभाष नलावडे )**
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रत माहितीसाठी :-**

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
२) या सचिवालयातील सर्व अधिकारी/ कर्मचारी
३) या सचिवालयातील सर्व कक्ष
४) संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

\\MLS-DATASERVER\C Branch\२०२२\MLS C २०२२\PJT\PJT-२०२२\Training\Training\Circular.doc